महासागर वर्धा
शुक्रवार, १३ जून २०२५
पान ३

## अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती योजनेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. १२ जून**
साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ जिल्हा कार्यालयाच्यावतीने या शैक्षणिक वर्षात उत्तीर्ण झालेल्या १० वी, १२ वी, पदवी, वैद्यकीय व अभियांत्रिकी इत्यादी अभ्यासक्रमामध्ये विशेष प्राविण्याने किंवा त्यापेक्षा गुणवत्ता मिळवून उत्तीर्ण झालेल्या मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील विद्यार्थ्यांना महामंडळाकडुन जेष्ठता व गुण क्रमांकानुसार अण्णाभाऊ साठे शिष्यवृत्ती मंजुर करण्यात येणार आहे.
मातंग समाज व तत्सम १२ पोटजातीतील मादगी व मादिगा पोटजातीतील विद्यार्थी, विद्यार्थीनींनी जिल्हा कार्यालय संपर्क साधुन शिष्यवृत्तीसाठी अर्ज करावे, असे महामंडळाच्या जिल्हा व्यवस्थापकांनी कळविले आहे. तसेच विद्यार्थी, विद्यार्थीनींनी आपले अर्ज साहित्यरत्न लोकशाहीर अण्णाभाऊ साठे विकास महामंडळ जिल्हा कार्यालय, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सेवाग्राम रोड वर्धा येथे दि. २० जुन पर्यंत सादर करावे. उशिरा आलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही, असे कळविण्यात आले आहे.

# कृषी खात्यातील डिकामालीचा जोड ; ढोणे व पेटकर यांनी माजविला उधम

**नरेंद्र देशमुख**
**वर्धा, दि. १२जून**
जिल्ह्यात कृषी अधीक्षक पद प्रभारी असल्याने कृषी अधीक्षक कार्यालयातील सहायक कृषी अधिकारी प्रमोद पेटकर व जिल्हा परिषदेचे कृषी विभागातील सहायक कृषी अधिकारी संदीप ढोणे यांचा फेव्हीकॉलसारखा डिकामालीचा जोड कृषी केंद्र संचालकांना वेठीस धरुन गाव खेडयात प्रतिष्ठीत असलेल्या नागरिकांनासुध्दा मद्यधुंद अवस्थेत घराची, शेताची व शेतातील बंड्याची झाडाझडती घेण्याच्या उद्देशाने शेजारीं असलेल्या पारिवारीक घरी ज्याचा शेतीशी किंवा कृषी व्यवसायाशी तिळमात्र संबंध नाही. अशाही घरी पोलिसांसमक्ष झाडाझडती घेत असताना कुटुंबातील वृध्दांना धक्काबुक्की करीत सामानाची नासधूस करुन जमा रकमेपैकी



हीच ती डीकामालीची जोडी संदीप व प्रमोद

काहीही न सापडल्याने पैसे चोरुन नेण्याचा प्रकार या डिकामालीच्या जोडीने २८ मे रोजी अल्लीपूर पो.स्टे.अंतर्गत येणा-या कानगाव-नांदगावात उधम माजविल्याने ते चांगलेच चर्चेत आले.
हिंगणघाट तालुक्यातील नांदगाव -(कानगाव)येथील प्रतिष्ठित असलेले माजी सरपंच सतिशठाकरे यांच्याघरी कुठलीही तक्रार नसताना दि.२८ मे च्या मध्यरात्री जिल्हा परिषदेचे कृषी सहायक अधिकारी संदीप ढोणे व जिल्हा कृषी अधीक्षक खात्यात नव्यानेच पदभार मिळालेले सहायक कृषी अधिकारी या डिकामालीच्या जोडीने भरारी पथकाच्या नावावर चांगलाच उधम माजविला. संदीप ढोणे यांनी आपले वरिष्ठ संजय बमनोटे तर प्रमोद पेटकर यांनी आपले वरिष्ठ चंद्रपूर जिल्हा कृषी अधिक्षक शंकर तोटावार यांचेकडे वर्ध्याचा प्रभार असताना त्यांचीसुध्दा परवानगी न घेता कुठलीही पुर्वसुचना न देता गावातील राजकीय विरोधकांच्या इशा-याने एका धाब्यावर भोजनावळीसह मदिरा प्राशन करीत मदिरेची झिंग चढली असताना अल्लीपूर पोलिसांना सुचना देत दोन पोलिस कॉन्स्टेबल कर्तव्यावर घेऊन माजी सरपंच सतिश ठाकरे यांचे घरी मध्यरात्री १२ वाजता आम्ही कृषी खात्यातील भरारी पथक अधिकारी असुन तुमच्या घरी बोगस बि-बियाणे खतांचा साठा असल्याची माहिति प्राप्त झाल्यानुसार झाडाझडती घ्यायची आहे. असे कुठलेही कारण न सांगता पोलिसांसमक्ष बेधडक ठाकरे यांच्या घरात शिरुन सामानाची फेकाफेकी व नासधूस करीत असताना वृध्द आईस धक्काबुक्की केली, झाडाझडती घेतली.परंतु हाती धुपाटणे आल्याने आक्राळविक्राळ झालेल्या संदीप व प्रमोदने आपला मोर्चा शेजारील घरात वळविला. त्या घरीसुध्दा असाच प्रकार करीत कडधान्य असलेल्या त्या डब्याची झाडाझडती घेतली असता त्या कुटुंबप्रमुख महिलेने तुटपूंजी रक्कम जमा करीत अंदाजे ६० हजार रुपयाच्या वर जमापुंजी डब्यात ठेवली असताना झाडाझडती करीत घराच्या बाहेर गेलेल्या कृषी खात्यातील डिकामालीच्या जोडीने त्या रकमेतील काही रक्कम चोरुन नेल्याची तक्रार पोलिस अधीक्षक, जिल्हाधिकारी वर्धा यांचेकडे कुटुंबप्रमुख संजय अण्णाजी घोडे यांनी केली असता अद्यापही कुठलीच कारवाई होत नसल्याने घोडे व ठाकरे हे कृषी खात्यातील डिकामालीचा जोड असलेल्या संदीप ढोणे व प्रमोद पेटकर यांचे विरुध्द मानहानीचा दावा करणार असल्याची माहिती प्राप्त झाली आहे.

(क्रमशः....)

# वाघाच्या हल्ल्यात युवक ठार

**❒ हिंगणी वनपरीक्षेत्रातील घटना, ❒ वर्षभरापूर्वीच झाला होता विवाह**




**महासागर प्रतिनिधी**
**कारंजा (घा), दि. १२जून**
गुरे चारून घरी परत येत असलेल्या गुराख्यावर वाघाने हल्ला करुन त्याला ठार केल्याची घटना ११ जून रोजी हिंगणी वनपरिक्षेत्रातील उमराविहिरी परिसरात घडली. मेटरहिरजी येथील आशिष अर्जुन अवथळे वय(३०) असे मृतक गुराख्याचे नाव आहे.या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.
आशिष अवथळे हा युवक नेहमीच गुरे चराईसाठी जात होता. घटनेच्या दिवशी मृतक हा गुरांना चारा चारून घरी परत येत होता. उमरविहिरी बिट मधील कम्पर्टमेन्ट नं. ४१ मधील झाडात बसून असलेल्या वाघाच्या मादीने हल्ला केला. ही घटना वन्यजीव जंगलक्षेत्र हिंगणी वनपरीक्षेत्रातील उमरविहिरी येथे घडली. या वाघीणने या गुराख्याच्या एका म्हशीला जखमी केले. या घटनेची शेजारीच गुरे चारणाऱ्या मृतकाच्या काकाला माहिती मिळताच त्यांनी घटनास्थळी धाव घेतली. यावेळी गावकरी व वनविभागाच्या कर्मचाऱ्यांची घटनास्थळी मोठी गर्दी जमली होती. शवविच्छेदनासाठी मृतदेह कारंजा येथील ग्रामीण रुग्णालयात आणण्यात आला आहे. या युवकाचे वर्षभरापूर्वीच लग्न झाले होते. त्याच्या मागे पत्नी, आई, वडील, लहान भाऊ असा परिवार आहे. युवकाच्या आकस्मिक मृत्यूने संपूर्ण गावावर शोककळा पसरली आहे.

**वन विभागाने बसवले ट्रॅप कॅमेरे**
हिंगणी वनपरिक्षेत्राचे वरिष्ठ वन्यजीव अधिकारी, अधिकारी आणि कर्मचारी घटनास्थळी पोहोचले होते., त्यांनी घटनेचा पंचनामा केल्यानंतर . गेल्या काही दिवसांपासून परिसरात वाघ मुक्तपणे फिरत असल्याचे सांगितले. एका मादी वाघिणीने हा हल्ला केल्याची प्राथमिक माहिती आहे. सुरक्षेच्या कारणास्तव, वन विभागाने परिसरात ट्रॅप कॅमेरे बसवले. परिसरातील शेजारच्या गावांमध्ये अलर्ट जारी करण्यात आला आहे.

# शेतकऱ्यांच्या प्रश्नांकरीता अडवली आमदार केचे यांची गाडी

**प्रहार सोशल फोरमच अनोख आंदोलन**



**महासागर प्रतिनिधी**
**आर्वी, दि. १२जून**
माजी मंत्री बच्चु कडू यांच्या आंदोलनाला पाठींबा देत येथील सोशल फोरमच्या शेतकरी पदाधिकाऱ्यांनी गुरूवारी (ता.१२) येथील शिवाजी चौकात आमदार दादाराव केचे यांची गाडी अडवुन त्यांना मागणीचे निवेदन दिले.
येथील प्रहार सोशल फोरमच्या पदाधिकाऱ्यांनी माजी मंत्री बच्चु कडू यांची भेट घेवुन आल्या नंतर बाळ जगताप यांच्या नेतृत्वात विविध प्रकारचे आदोलन सुरू केले आहे. बुधवारी (ता.११) तहसीलदार यांच्या दालनात जावुन त्यांच्या समोर अंगावरील कपडे उतरवीले आणी त्यांना मागण्याचे निवेदन दिले.
तर, गुरूवारी (ता.१२) येथील शिवाजी चौकात दडून बसलेल्या पहार सोशल फोरमच्या पदाधिकाऱ्यांनी आमदार दादाराव केचे यांची गाडी येतांना पाहुन ती अडवीली आणी तिच्या समोर झोपले. या वेळी बाळ जगताप यांनी शेतकऱ्यांच्या व इतर मागण्या त्यांच्या समोर मांडल्या. आंदोलन करणाऱ्यात बाळा जगताप, सुधीर जाचक, अंकुश गोटेफोडे, छोटू चव्हाण, गोलू वाघ, विक्रम भगत आदिंचा समावेश आहे.

**आमदार केचे यांनी केला आंदोलनकर्त्यांचा सन्मान**
गाडी थांबवुन आमदार दादाराव केच हात जोडत बाहेर आले. आंदोलकांच म्हणन नम्रपणे ऐकूण घेतल. त्यांच्या मागण्या रास्त असल्याची कबुली सुध्दा दिली. यामुळे अश्वस्थ झालेल्या आदोलकांनी अडवीलेला रस्ता सोडला, यानंतर बाळ जगताप यांच्या नेतृत्वात दिलेले निवेदन सन्मानाने स्वीकारुन येत्या अधीवेशनात शेतकऱ्यांचे प्रश्न विधान परिषदेत लावुन धरणार असल्याचे आश्वासन सुध्दा दिले.

**वाचकांकरिता सूचना**
बुधवार, दिनांक ११ जून २०२५ रोजी दैनिक महासागर मुख्य अंकाचे पृष्ठ क्रमांक १ ला मास्ट हेडचे खाली बुधवार, दि. १२ जून २०२५ असे प्रकाशित करण्यात आले असून ते बुधवार दि.११ जून असे वाचावे.
-स्थानिक संपादक
दैनिक महासागर, वर्धा

# दुचाकी डिव्हायडरला धडकुन अपघात, युवक जागीच ठार

## धाडी बस स्टॉप परिसरातील



**महासागर प्रतिनिधी**
**आष्टी(श) दि. १२जून**
वरुड वरून लग्न समारंभ आटोपून दुचाकीने परत येत असताना युवकाची दुचाकी डिव्हायडर ला धडकल्याने झालेल्या अपघातात त्याचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात आज १२ जून रोजी दुपारी ४ वाजता धाडी बसस्टॉप परिसरात घडला.
सविस्तर वृत्त असे की, आष्टी येथील रहिवासी मृतक ललित साहेबराव पाटील वय (३८) रा. आष्टी हा व कुटुंबातील सर्वजण वरुडला लग्न समारंभाला गेले होते. लग्न समारंभ उरकल्यानंतर मृतक ललित हा स्वतःच्या दुचाकी क्रमांक एम एच ३२ टी ३६ ८१ या गाडीने एकटाच गावला परत येत असताना धाडी बस स्टॉप परिसरात मृतक ललित ची गाडी डिव्हायडरला धडकली व अपघाता झाला. यामध्ये ललीतचा जागीच मृत्यू झाला. ललित हा . एलआयसी एजंट असून अविवाहित होता. आष्टी पोलीस यांना माहिती मिळताच घटनास्थळ गाठून पंचनामा करून मृतकाचे शव उत्तरही तपासणीकरिता पाठविण्यात आले आहे.पुढील तपास ठाणेदार राजेश जोशी यांच्या मार्गदर्शनात पोलीस करीत आहे. मृतक ललितच्या पश्चात आई, भाऊ असा परिवार आहे.

## वाद घालून तिघांनी केली एकाला मारहाण

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि.१२ जून**
तिघांनी एका व्यक्तीसोबत वाद घालून एका व्यक्तीला मारहाण केली, मिळालेल्या माहितीनुसार, किशोर तेलंग (वय ४२) हा संदीप भुजाडे यांच्या घरी बसला होता, तिथे त्याचा अमर डुकरे, साहिल डुकरे आणि गुडडू तेलतुमडे यांच्याशी तोंडी वाद झाला, वादात असलेल्या किशोरने त्याला शिवीगाळ केली, ज्याला तिघांनी आक्षेप घेतला, गुडडू तेलतुमडे, अमर डुकरे आणि साहिल डुकरे यांनी त्याला काठीने मारहाण केली, ज्यामुळे किशोर जागीच बेशुद्ध पडला, त्याला तातडीने जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी आणण्यात आले, याप्रकरणी देवळी पोलिस ठाण्यात देवळी पोलिस ठाण्यात किशोर तेलंग यांच्या तक्रारिवरुन अमर डुकरे, साहिल डुकरे आणि गुडडू तेलतुमडे यांच्याविरुद्ध देवळी पोलिसांनी गुन्हा दाखल केला.

# मोटार सायकल ट्रकवर धडकल्याने एक जागीच ठार



**महासागर प्रतिनिधी**
**तळेगाव (शापं.), दि. १२जून**
नागपूर अमरावती राष्ट्रीय महामार्ग क्र.६ वर बुधवार ११ जूनच्या रात्री उभ्या असलेल्या ट्रकला मागुन मोटरसायकलने धडक दिली त्या धडकेत झालेल्या अपघातात युवक जागीच ठार झाला.
सविस्तर वृत्त असे की इंदर मारी येथील रहिवासी गौरव प्रकाश उईके वय (२५)हा तळेगावला काही कामानिमित्त आपल्या मोटर सायकल क्र. एम. एच. ३२ झेड ३६७३ ने आला होता. तळेगाववरून काम आटोपून इंदरमारीच्या दिशेने जात असताना तळेगाव मधील बाहुबली हनुमान मंदिर परिसरात उभा असलेला ट्रक क्रमांक एम एच ४० बी एल १३१७ हा नादुरुस्त स्थितीत उभा होता. अंधाराचा वेळ असल्याने गौरवला उभा असलेल्या ट्रक न दिसल्यामुळे मागुन जोरदार धडक दिली. धडक इतकी जबरदस्त होती की मोटरसायकलचा पूर्णता चुराडा झाला, व गौरवच्या डोक्याला अतीगंभीर स्वरूपाचा मार लागल्यामुळे तो घटनास्थळीच ठार झाला.या घटनेची माहिती तळेगाव पोलीस स्टेशनला देण्यात आली तळेगाव पोलीस घटनास्थळावर पोहोचले व पंचनामा करून मृत युवकाचे प्रेत उतरणीय तपासणी करिता आर्वीला येथील ग्रामीण रुग्णालयात नेण्यात आले तळेगाव पोलिसांनी चालक व वाहक यांना ताब्यात घेतले असून ट्रक चालक कैलास तुळशीराम परतेती वय (४५)रा.खैरी खुर्द व वाहक शुभम नथुजी गोडबोले वय (२१)वर्ष यांना पोलिसांनी ताब्यात घेतले असून रात्री उशिरापर्यंत चौकशी सुरू होती घटनेचा पुढील तपास तळेगाव पोलीस करीत आहे.

कामगार राज्य विमा महामंडळ
(कामगार आणि रोजगार मंत्रालय, भारत सरकार)
कर्मचारी राज्य बीमा निगम
(श्रम एवं रोजगार मंत्रालय, भारत सरकार)
EMPLOYEES' STATE INSURANCE CORPORATION
(Ministry of Labour & Employment, Govt. of India)
प्रादेशिक कार्यालय / क्षेत्रीय कार्यालय / Regional Office
पंचदीप भवन, 108, ना. म. जोशी मार्ग, लोअर परळ, मुंबई - 400013
पंचदीप भवन, 108, ना. म. जोशी मार्ग, लोअर परेल, मुंबई - 400013
Panchdeep Bhawan, 108, N. M. Joshi Marg, Lower Parel, Mumbai-400013
दूरध्वनी क्र. / दूरभाष सं. / Telephone No.: 022-61209700/742
ईमेल/ईमेल/Email: rd-maharashtra@esic.nic.in
संकेतस्थळ / वेबसाइट / Website: www.esic.gov.in

**महाराष्ट्र राज्यात सुपर स्पेशालिटी सेवा (केवळ तृतीय सेवा) प्रदान करण्यासाठी आरोग्य सेवा संस्थाच्या पनेलमेंटसाठी स्वारस्य अभिव्यक्ति (ईओआय) आमंत्रित करणारी सूचना**

कर्मचारी राज्य विमा महामंडळ, क.रा.वि लाभार्थ्यांना महाराष्ट्र राज्याच्या सर्व जिल्ह्यातील कर्मचारी / पेंशनधारक व्यक्तींना सीजीएचइस / ईएसआयसी/एम्स, नवी दिल्लीच्या दरांनुसार सुपर स्पेशलिटी कॅशलेस आधारावर सेवा प्रदान करण्यासाठी नामांकित आरोग्य सेवा संस्थाशी (एचसीओ) (हॉस्पिटल / डायग्नोस्टिक सेंटर / इमेजिंग सेंटर /डायलिसिस सेंटर/ ब्लड बँक) करार करण्याचे विचाराधीन आहे. इच्छुक आणि पात्रता असलेल्या अनुभवी आरोग्यसेवा संस्था त्यांची ' अभिरूचीची अभिव्यक्ति' (ईओआय) आणि सर्व बाबतीत पूर्ण असलेले संलग्नक आणि कागदपत्रे सीलबंद कवरमध्ये राज्य वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी राज्य विमा महामंडळ, विभागीय कार्यालय, महाराष्ट्र यांना सदर करू शकतात.
ईओआय सादर करण्याची तारीख आणि संबंधित अटी, शर्ती आणि मार्गदर्शक तत्त्वांबद्दलच्या तपशीलांसाठी, कृपया https://www.esic.gov.in/ro-sro/regional-office-mumbai किंवा http://www.eprocure.gov.in ला भेट द्या.

हुकुमावरून
क्षेत्रीय निदेशक–महाराष्ट्र
कर्मचारी राज्य विमा महामंडळ

# संसदीय समिती समवेत खासदार काळे हयांचा भूवनेश्वर-ओडीसा दौरा

## शिक्षण, महिला व बालकल्याण, युवा व क्रिडा संबधी अनेक मुद्दांवर चर्चा



**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. १२जून**
खासदार अमर काळे यांचा शिक्षण महिला व बालकल्याण युवा व क्रिडा संसदीय समितीचा ओडीसा राज्यातील भुवनेश्वर येथील दि. १० जून ला दौरा पार पडला. दौऱ्यात त्यांनी ओडीसा राज्यात उच्च शिक्षण व संशोधनचे क्षेत्रात प्रगती करुन क्षेत्र अधिक विकसीत कसे करावयाचे याबाबत चर्चा झाली.
या बैठकीत भारत सरकारचे उच्च शिक्षा विभाग, उच्च शिक्षण विभाग ओडीसा सरकार, आय.आय.टी. भुवनेश्वर, आय.आय.एस. ई.आर. बेईमपूर, एन.आ.टी. राऊरकेला, आय.आय.एम., संबलपूर, ओडीसा केंद्रीय विश्व विद्यालय, कोरापूर येथील प्रतिनिधी हजर होते. या दौऱ्यातच पुढील बैठक ही क्रिडा विभागाशी संबधीत झाली त्यात ओडीसा राज्यात असलेल्या बॅकांच्या सी.एस.आर. फंडाच्या माध्यमातून राज्यातील खेळाला (क्रिडा क्षेत्राला) अधिक विकसीत कसे करता येईल याबाबत सुध्दा चर्चा झाली. या बैठकीत प्रामुख्याने सार्वजनीक क्षेत्रातील भारतीय स्टेट बँक, बँक, ऑफ बडोदा, पंजाब नॅशनल बँक, बँक ऑफ इंडिया यांचे प्रतिनीधी हजर होते. सदर बैठक कलीगंडा स्टेडीयम, ओडीसामध्ये घेण्यात आली. भारत सरकारचा क्रिडा विभाग व ओडीसा सरकारचा क्रिडा विभाग यांच्या समिती सदस्यासोबतच्या संयुक्त बैठकीतून क्रिडा क्षेत्राचे माध्यमातून युवांचा विकास साध्य करणे. युवकामध्ये क्रिडा विषयी रुची निर्माण होईल व युवकांच्या सहभागातून क्रिडा क्षेत्राचा विकास कसा साधता येईल याबाबत सुध्दा चर्चा झाली. या चर्चेत प्रामुख्याने क्रिडा विभाग ओडीसा सरकार खासदार अमर काळे यांचेसह सर्व समिती सदस्यांचा सहभाग होता. वर्धा लोकसभा मतदार संघाचे खासदार अमर काळे यांचा समावेश असलेल्या संसदीय समितीची महत्वाची सभा म्हणजे महिला व बालकल्याण विभागाची सभा होय.
कटक येथे झालेल्या समेत महिला व बालकल्याण विभाग ओडीसा सरकार मंत्रालय प्रतिनिधी, भारत सरकार महिला व बालकल्याण विभाग मंत्रालय प्रतिनीधी, महिला व बालकल्याण विभागाचे विविध पदाधिकारी सहभागी होते. या सभेत प्रामुख्याने शक्ती सदन, सखी निवास, वन स्टॉप सेंटर महिलांचा राज्यांच्या, देशाच्या विकासात सहभाग स्त्रीचे कुटुंबातील स्थान, स्त्रीयांचा होणारा मानसिक शारीरीक, आर्थिक छळ व त्यावर फास्ट ट्रॅक न्यायालये, ग्रामीण भागात महिला हेल्पलाईन व व्यापक जनजागृती मोहिमेची खरी गरज आहे असाही सभेत सूर होता. एवढेच नाही तर पुरुष प्रधान मानसिकतेत बदल आवश्यक असल्याचे काही सदस्यांनी मत व्यक्त केले. एवढेच नाही तर कौटुंबीक वाद व त्यातून उदभवणारे घटस्फोट इत्यादी विषयावर चर्चा झाली. लहान मुलांचे संगोपन त्यांच्यात आढळणारे जन्मजात आजार व सर्वात महत्वाचा म्हणजे कामगारामध्ये लहान मुलांच्या संगोपणात होणारा दुर्लक्षीतपणा व बाल संगोपणात करावयाच्या उपाययोजना, महिलांचे सक्षमिकरण करण्याचे दृष्टीने करावयाच्या उपाययोजना यासह अनेक विषयांवर चर्चा झाली. खासदार अमर काळे यांचा हा दौरा व दौऱ्यात झालेल्या विविध विषयावरील चर्चा. असलेल्या समस्या व त्यावर उपाययोजना यावर चर्चा झाल्यात. एकंदरीत हा दौरा अभ्यासकात्मक दृष्टीने अत्यंत महत्वाचा ठरला व याचा फायदा स्वतःचे मतदार संघात काम करतांना निश्चितच होईल असे मत त्यांनी व्यक्त केले.

## ग्राम पंचायत कार्यालय नागझरी

**पंचायत समिती देवळी, जि. वर्धा**
**निविदा सूचना ( पहिली वेळ )**

ग्रा पं. नागझरी तालूका देवळी जिल्हा-वर्धा कडून कळविण्यात येते की, 15 वा वित्त आयोग 2024-25 निधीमधून काम करण्याकरिता नोंदणीकृत निविदाधारका कडून निवीदा ठराविक कालावधीत मागविण्यात येत आहे. करिता नोदणीकृत कंत्राटदार यांनी दोन बंद लिफापा मध्ये निवीदा सादर करावी कोरे निवीदा प्रपत्र किंमत रु 500/-

| अ. क्र. | कामाचे नांव व तांत्रिक मान्यता क्रमांक व प्राकलन किमत | निविदा सादर करण्याचा कालावधी | निविदा उघडण्याचा दिनांक |
|---|---|---|---|
| १ | सिमेंट नाली व रपटा बांधकाम तामाक्र 179 रु 3,15000/- | 16/6/2025 ते 22/6/2025 सायंकाळी 4.00 | २२ जून नंतर (कार्यालयीन दिवशी (सुटीचा दिवस वगळून) |

**कामाचे अटी व शर्ती खालीलप्रमाणे -** १) निविदाधारकास निवीदा भरतेवेळी कामाचे किमतीचे १ टक्का सूरक्षा ठेव भरावे लागेल ग्रा. पं. बँक खाता क्र ५५००१०१००४०३० IFSC-CNRB0005500 (कॅनरा बँक) २) मंजूर निविदाधारकास काम मंजूर झाल्यानंतर ४ टक्के सूरक्षा ठेव भरावी लागेल ३) मंजूर कामाचा कार्यारंभ मिळाल्यापासून १५ दिवसात काम चालू करावे लागेल. अन्यथा ४) शासन निर्णयानूसार कपात करण्यात येईल ५) निवीदेबाबत व कामाबाबत मंजूर / नामंजूर चे अधिकार ग्रा प स्वत:कडे राखून ठेवीत आहे .

सचिव
ग्रा.पं. नागझरी

प्रशासक
ग्रा.पं. नागझरी

महासागर शुक्रवार, १३ जून २०२५
वर्धा
पान ६

# दोन गुन्हेगार दोन वर्षासाठी तडीपार

**महासागर प्रतिनिधी**
**अल्लीपुर, दि. १२ जून**

आगामी येणारे सण, उत्सव काळात शांतता अबाधित रहावी, या उददेशाने अल्लीपुर पोलिसांच्या पुढाकाराने रेकॉर्डवर असलेल्या जितेंद्र लढे (25 रा. कानगाव) यांना दोन वर्षासाठी हददपार करण्याचा आदेश पारित केला,

दोन्ही गुन्हेगारांवर दारु विक्रीसह मारहाण तसेच इतर असे अनक गुन्हे अभिलेखावर दाखल आहेत, दोन्ही आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेत त्यांना यवतमाळ जिल्हयातील कळंब येथे नेऊन सोडण्यात आले, ही कारवाई सहायक पोलिस अधीक्षक राहुल चव्हाण यांच्या निर्देशनात सहायक पोलिस निरीक्षक विजय घुले, अश्विन खेडेकर, रवी वर्मा, राहुल नव्हाते, अनुप नाईक, योगेश चंदनखेडे यांनी केली, पोलिस ठाण्याच्या हददीतील सराईत गुन्हेगारांची कुंडली काढण्याचे काम सुरु करण्यात आले आहे, त्यामुळे गुन्हेगारांचे धाबे दणाणले आहेत.

# घरकुल लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करुन देण्याच्या पालकमंत्र्यांच्या सूचना

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. १२ जून**



राज्य शासनाच्या दि.८ एप्रिल २०२५ तसेच ३० एप्रिल २०२५ च्या वाळू, रेती निर्गती धोरणाच्या शासन निर्णयान्वये घरकुल लाभार्थ्यांना प्रत्येकी पाच ब्रास रेती मोफत वाटप करावयाची आहे. त्यानुसार जिल्हा प्रशासनाने घरकुल लाभार्थ्यांना वाळू उपलब्ध करून द्यावी, अशा सूचना पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी केल्या.

जिल्ह्यातील घरकुल लाभार्थ्यांना बांधकामासाठी तसेच इतर स्थानिक वापरासाठी वाळू उपलब्ध करुन देण्याकरीता व वाळू धोरण योजनेचा लाभ जास्तीत जास्त लाभार्थी व जनतेपर्यंत पोहोचविण्याच्या दृष्टीने जनजागृती होण्याकरीता करीता पालकमंत्री डॉ.भोयर यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. त्यावेळी त्यांनी या सूचना केल्या.

जिल्ह्यात स्थानिक वापरासाठी ६१ वाळूगट राखीव ठेवण्यात आलेले असून त्याद्वारे स्थानिक तसेच घरकुल लाभार्थ्यांना १४ हजार २१८ ब्रास वाळू उपलब्ध होणार आहे. जिल्ह्यात आतापर्यंत १ हजार ९४३ लाभार्थ्यांना ४ हजार ४५० ब्रास वाळू उपलब्ध करुन देण्यात आली आहे. तसेच उर्वरीत १० हजार ३०२ लाभार्थ्यांना ३५ हजार २३ ब्रास वाळू शासन निर्णय दि.३० एप्रिल २०२५ प्रमाणे वितरीत करण्याचे निर्देश पालकमंत्री डॉ.भोयर यांनी दिले. बैठकीला अप्पर जिल्हाधिकारी नरेंद्र फुलझेले, उपवन संरक्षक हरविर सिंह, उपविभागीय अधिकारी दीपक कारंडे, जिल्हा खनिकर्म अधिकारी श्रीकांत शेळके व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्मारकाने अखेर घेतला मोकळा श्वास

## माजी नगरसेवक सोनल ठाकरे यांच्या प्रयत्नांना यश



**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. १२जून**

आर्वी नाका चौक येथील राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या स्मारकावर बॅनर व झेंडे मागील काही महिन्यापासून लागून होते. त्यामुळे स्मारकाला विद्रुपता आली होतीच परंतु त्यामुळे समोरील वाहने दिसत नसल्याने अपघात वाढले होते.त्यामुळे स्मारकावरील बॅनर व झेंडे तात्काळ काढून टाकण्याची मागणी माजी नगरसेवक सोनल ठाकरे यांच्यातर्फे न.प.मुख्याधिका-यांना निवेदनाव्दारे करण्यात आली होती. प्रशासनाने बॅनर व झेंडे हटविल्याने राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्मारकाने मोकळा श्वास घेतला असुन माजी नगरसेवक ठाकरे यांच्या प्रयत्नांना यश आले आहे.

आर्वी नाका चौकाच्या मध्यभागी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज स्मारक आहे. मागच्या महिन्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा दौरा असतांना या स्मारकावर सत्ताधारी पक्षाचे बॅनर व झेंडे लावण्यात आले. परंतु अजूनही ते काढण्यात आले नाही. त्यानंतर काही खासगी तर एक शासकीय बॅनर तेथे लागले. त्यामुळे स्मारक पूर्णतः झाकोळून गेले होते. तसेच या बॅनर मुळे समोरच्या रोडवरील वाहने दिसत नसल्याने अपघात वाढले होते. आर्वी नाका चौकात शहराच्या विविध भागातून येणारे पाच रस्ते मिळतात. त्यामुळे वाहनांची मोठी वर्दळ येथे असते. बसेस, खाजगी ट्रॅव्हल्स ही याच मार्गाने जात असतात. आधीच चौकाच्या अगदी मधात हे स्मारक उभारण्यात आल्याने समोरील वाहन दिसत नाही. त्यामुळे येथे रोजच अपघात घडतात. त्यात या बॅनर व झेंड्यांची भर पडल्याने मोठा अपघात होण्याची शक्यता बळावली होती. याकरिता सोनल ठाकरे यांचेतर्फे हि बॅनर व झेंडे हटविण्याची मागणी केली होती. प्रशासनाने स्मारकावरील बॅनर व झेंडे काढून टाकल्याने स्मारकाला पुन्हा शोभा प्राप्त झाली आहे.

# पांडूरंग खानखोजे शासकीय आयटीआय येथे शिवराज्यभिषेक दिन साजरा



**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. १२ जून**

पांडूरंग सदाशिव खानखोडे शासकीय आयटीआय वर्धा येथे प्रविण गौड यांच्या प्रमुख उपस्थितीत आयएमसी सदस्य राहुल मुन, सुधीर रेलकर निसर्ग सेवा समितीचे अध्यक्ष मुरलीधर बेलखोडे, धर्मेंद्र मुंधडा, आयटीआयचे प्राचार्य कोकुलवार यांच्या उपस्थिती शिवराज्यभिषेक दिन साजरा करण्यात आला.

आत्मनिर्भर भारताच्या दिशेने वाटचाल करण्यासाठी स्वदेशी वस्तूंचा वापर जास्तीत जास्त प्रमाणात आपण केला पाहिजे स्वदेशी विचार म्हणजे देशातील उत्पन्नाचा संसाधनाचा आणि तंत्रज्ञानाचा वापर करणे गरजेचे आहे, असे धर्मेंद्र मुंधडा मार्गदर्शन करतांना म्हणाले.प्रविण गौड यांनी मातृ शक्तीचे तर राहुल मुन यांनी मराठी माणसानी व्यवसायाकडे वळले पाहिजे व व्यवसायाचे महत्व पटवून दिले. सुधीर रेलकर यांनी कुटूंबातील सदस्याने एकमेकांशी आदराने व सुसंवादाने वागले पाहिजे कुटूंब व्यवस्था टिकून ठेवली पाहिजे असे सांगितले. मुरलीध बेलखोडे यांनी पर्यावरणाचे महत्व यावर मार्गदर्शन केले. श्री. कोकुलवार यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा आर्दश आपल्या डोळ्यासमोर ठेवून प्रत्येकांने समाजासाठी आणि देशासाठी काम केले पाहिजे असे आवाहन केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक गटनिर्देशिका वाईकर यांनी केले. संचालन विलास भगत यांनी तर आभार श्री. जवंजाळ यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी संस्थेचे कार्यक्रम अधिकारी श्री. कडूकर, सर्व कर्मचारी यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला संस्थेतील विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# दिव्यांग क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांकडून प्रस्ताव आमंत्रित

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. 12 जून**

जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राच्या धर्तीवर नमो दिव्यांग शक्ती अभियानांतर्गत राज्यातील दिव्यांग व्यक्तींना आवश्यक सोयीसुविधा व मदत उपलब्ध करुन देण्यासाठी प्रत्येक जिल्ह्यात एक डीडीआरसी व्यतिरिक्त एक दिव्यांग पुनर्वसन केंद्र सुरु करण्यात येणार आहे. यासाठी दिव्यांग क्षेत्रात काम कारणाऱ्या संस्थांकडून प्रस्ताव मागविण्यात येत आहे.

इच्छुक संस्था दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम २०१६ अंतर्गत नोंदणी केलेली असावी. संस्थेमार्फत दिव्यांग व्यक्तींसाठी विविध योजना उपक्रम राबविल्याचा अनुभव असावा. संस्थेच्या स्वत:च्या नावे असलेली जागा, इमारत अथवा भाडे कराराने घेतलेली इमारत पुरेशी असावी. इमारत अडथळा मुक्त व सुयोग्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र असावे. समुपदेशन व थेरपीसाठी तज्ञ व्यक्ती तसेच आवश्यक व पुरेशा प्रमाणात मनुष्यबळ उपलब्ध असावे. संस्थेकडे बँक खात्याचा तपशील असणे आवश्यक आहे. प्रस्ताव तयार करतांना काही अडचण आल्यास जिल्हा समाज कल्याण कार्यालयाच्या ०७१५२-२४२७८३ या दुरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे जिल्हा समाज कल्याण अधिकारी प्रतिभा भागवतकर यांनी कळविले आहे.

# शहरातील डांगरी वॉर्डात दुषित पाणी पुरवठा

## महिलांची न. प. कार्यालयावर धडक

**महासागर प्रतिनिधी**
**हिंगणघाट, दि. १२ जून**

शहराच्या डांगरी वॉर्डात पाणी पुरवठा योजनेच्या माध्यमातून दुषित पाणी पुरवठा होत असल्याने आक्रमक झालेल्या महिलांनी नगरपालिका कार्यालयात धडक देत अधिका-यांनी जाब विचारला,

शहरात अमृत योजनेच्या माध्यमातून पाणी पुरवठा योजनेचा विस्तार करण्यात आला, नागरिकांना नियमित पाणी पुरवठा व आरोग्याच्या दृष्टीने शुद्ध जलसेवा नळापर्यंत पोहोचविण्याचे उदिदष्ट या योजनेमार्फत करण्यात येते, परंतु, या योजनेचा लाभ शहरातील नागरिकांना खरच मिळत आहे, का, हा प्रश्न उपस्थित होत आहे, डांगरी वॉर्डात गेल्या तीन ते चार दिवसांपासून अनियमित व दूषित पाणी पुरवठयामुळे नागरिकांची गैरसोय होत असून, पाण्यासाठी भटकंती होत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

त्याचबरोबर दुषित पाणी पुरवठयामुळे नागरिकाच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे, या मागणी डांगरी वॉर्ड परिसरातील नागरिकांनी आणि महिलांनी नगरपालिका कार्यालया गाठून या संदर्भात

अधिकायांना जाब विचाराला व प्रश्नांचा भडीमार करत समस्या मार्गी लागण्याची मागणी नागरिकांनी निवेदनातून केली आहे,

### मोटारसायकल स्वाराला लुटले

**वर्धा, :** सेवा समाप्ती करुन घरी परतणा-या एका व्यक्तीला वाटेत थांबवून त्याचे पैसे आणि मोबाईल लुटण्यात आले, शहरालगतच्या नागठाणा रस्त्यावर ही घटना घडली, झाडगाव येथील रहिवासी संदेश गौतम वाघमारे (३४) हा सेवा समाप्ती नंतर गावी परतत होता.

# आचार्य पदवीने हर्षदा गलांडे सन्मानित

**महासागर प्रतिनिधी**
**देवळी, दि. १२ जून**

येथील हर्षदा रमेश गलांडे यांना वसंतराव नाईक मरा'वाडा कृषी विद्यापी' परभणी यांना आचार्य पदवी (पीएचडी. ) देऊन नुकतेच सन्मानित करण्यात आले,

डॉ. हर्षदा गलांडे यांनी पीएचडी मिळविताना उद्यानविद्या (भाजीपालाशास्त्र) या विषयावर संशोधन केले, त्यांना परभणी येथील वसंतराव नाईक कृषी विद्यापी'चे फलोत्पादन विभाग प्रमुख डॉ. व्ही. एस. खंदारे यांचे मार्गदर्शन लाभले, डॉ. हर्षदा यांनी वर्ष २०२२ मध्ये सादरीकरण करण्यात आले, या दरम्यान, त्यांनी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय परिसंवाद, संशोधन पत्र, सारांश, लेख आणि पुस्तक प्रकाशनावर भर दिला,त्र त्यांना आपले संशोधन कार्य उत्कृष्टरित्या सादर केल्याने परभणी येथील वसंतराव नाईक कृषी विद्यापी'ने कृषी विद्यापी'ने पी. एच. डी. देऊन सन्मानि५त केले, त्यांनी या कार्यात सहकार्य करणा-याचे आभार मानले असून त्याचे सर्वत्र स्वागत होत आहे.

# नारायण सेवा मित्र परिवाराच्यावतीने देशी प्रजातींच्या वृक्षांची लागवड

**महासागर प्रतिनिधी**
**हिंगणघाट, दि. १२ जून**

येथील नारायण सेवा मित्र परिवाराच्यावतीने जागतिक पर्यावरणदिनी गौरक्षण संस्था परिसरात विविध देशी प्रजातींच्या वृक्षांची लागवड करण्यात आली.याप्रसंगी वड, पिंपळ, कडूनिंब,आवळा आदि वृक्षांचे रोपण करण्यात आले.

देशी प्रजातींच्या वृक्षांची लागवड दिवसेंदिवस कमी होत असुन विदेशी वृक्षांचे रोपण मोठ्या प्रमाणात होत आहे. त्यामुळे देशी वृक्षांची लागवड होणे गरेजेचे आहे, या उद्देशाने देशी वृक्षांची लागवड करण्यात आली. कार्यक्रमाला नारायण सेवा मित्र परिवाराचे अध्यक्ष महेश अग्रवाल, महेश दिक्षीत, विजयसिंह मोहता, लक्ष्मण डहाके, मनोज सिंघवी, प्रा.किरण वैद्या, दुर्गाप्रसाद यादव, रामदास खडगी, ॲड.विशाल जैन, रितेश पिपलवा, सुभाष लालवानी, रमेश रानपुरा, यशवंत गढवार, दिलीप घिया, ज्ञानेश्वर गहुरकर, नीता घिया, किरण अग्रवाल, शुभांगी वैद्या, राकेश झाडे, विजय खोब्रागडे, विशाल ब्राह्मणकर, अविनाश चव्हाण आदी उपस्थित होते.

# मोटर सायकल चोरटा पोलिसांच्या ताब्यात

## गुन्हे शोध पथकाची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, १२ जून**



अज्ञात इसम मोटर सायकल विकण्याकरिता सेवाग्राम रेल्वे स्टेशन परिसरात फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.माहितीच्या आधारावर सापळा रचून इसमास ताब्यात घेत विचारपूस केली असता त्याने त्याचे नाव अनुराग प्रविण धाबर्डे रा.तळोदी (सेलू ) असे सांगितले. ही कारवाई शहर पोलिस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने केली.

त्यास मोटर सायकल चोरीबाबत विचारणा केली असता त्याने ही मोटर सायकल बजाज चौक येथून चोरी केली असल्याचे सांगितले.त्याचेकडून एम.एच.३२-५८२९ क्रमांकाची मोटर सायकल जप्त करण्यात आली. ही कारवाई पोलिस अधीक्षक अनुराग जेन, अपर पोलिस अधीक्षक डॉ.सागर कवडे, उपविभागीय पोलिस अधिकाी प्रमोद मकेश्वर, यांच्या निर्देशानुसार पोलिस निरीक्षक पराग पोटे यांच्या मार्गदश्रनात पोलिस उपनिरीक्षक शरद गायकवाड, गुन्हे शोध पथकाचे प्रशांत वंजारी, नरेंद्र कांबळे, वैभव जाधव, श्रावण पवार यांनी केली.

### निधन वार्ता

**शैलेश वसू**



**वर्धा :** स्थानिक प्रतापनगर येथील रहिवासी शैलेश वसु यांचे आज १२ जून रोजी अल्प आजाराने सावंगी रुग्णालयात निधन झाले. ते ४७ वर्षाचे होते. त्यांची अंत्ययात्रा १३ रोजी सकाळी ९ वाजता त्यांच्या राहत्या घरून निघेल. त्याचे पश्चात पत्नी, मुलगा असा परिवार आहे.

### युवकाने जिवनयात्रा संपविली

**वर्धा, :** लोखंडी अँगलला साडीने गळफास घेत युवकाने आत्महत्या केली, ही घटना धामकुंड येथे घडली, धीरज मुकिंदा गळहाट (२२) असे मृताचे नाव आहे.

# हिंदी विश्वविद्यालयात शैक्षणिक धोरण अभिमुखता आणि संवेदनशीलता कार्यक्रम

## १६ ते २३ जून दरम्यान

**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. १२ जून**

महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विश्वविद्यालयात यूजीसी-मालवीय मिशन शिक्षक प्रशिक्षण केंद्र(एमएमटीटीसी)द्वारे राष्ट्रीय शिक्षण धोरण अभिमुखता आणि संवेदनशीलता कार्यक्रम 16 ते 23 जून 2025 पर्यंत दुपारी 02:45 ते संध्याकाळी 06:00 दरम्यान गुगल मीटच्या माध्यमातून ऑनलाइन आयोजन केल?या जात आहे.

कार्यक्रमात सर्वांगीण आणि बहुशाखीय शिक्षण, भारतीय ज्ञान प्रणाली आणि बहुभाषिकता, शैक्षणिक नेतृत्व, प्रशासन आणि व्यवस्थापन, उच्च शिक्षण आणि समाज, शोध आणि विकास, कौशल्य विकास, विद्यार्थ्यांची विविधता आणि सर्वसमावेशक शिक्षण, माहिती आणि दळणवळण तंत्रज्ञान, संस्थेची स्वायत्तता आणि विद्यार्थ्यांची निवड, अभ्यासक्रम, विकास, शिक्षणशास्त्र आणि मूल्यांकन या विषयांवर मार्गदर्शन करण?यात येईल. कार्यक्रमात केंद्रीय, राज्य, मानित विश्वविद्यालये, खाजगी विश्वविद्यालये, राष्ट्रीय महत्त्वाच्या संस्था, महाविद्यालये आणि इतर उच्च शिक्षण संस्थांचे प्राध्यापक सदस्य, विविध व्यावसायिक परिषदा किंवा एआयसीटीई, एनएमसी, बीसीआय, आयएनसी, पीसीआय, आयसीएआर इत्यादींच्या अंतर्गत एचईआई उच्च शिक्षण संस्थांमधील प्राध्यापक, कंत्राटी, तात्पुरते, अतिथी प्राध्यापक, शिक्षक आणि शोधार्थी सहभागी होऊ शकतात.

हा शिक्षण प्रशिक्षण कार्यक्रम करियर ॲडव्हान्समेंट स्कीम (सीएएस) अंतर्गत पदोन्नतीसाठी वैध असेल प्रशिक्षण कार्यक्रमासाठी अर्ज करण्याची शेवटची तारीख 15 जून आहे. या कार्यक्रमासाठी नोंदणी करण्याची लिंक विश्वविद्यालयाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. कुलगुरू प्रो. कुमुद शर्मा कार्यक्रमाच्या संरक्षक तर साहित्य विद्यापीठाचे अधिष्ठाता अवधेश कुमार संयोजक असतील.

# वृक्षारोपण मोहिमेतून दिला पर्यावरण संवर्धनाचा संदेश



**महासागर प्रतिनिधी**
**वर्धा, दि. १२ जून**

शालिनीताई मेघे कॉलेज ऑफ नर्सिंग, सालोड (हिरापूर) येथे जागतिक पर्यावरण दिनानिमित्त वृक्षारोपण मोहीम राबवून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला.

या वृक्षारोपण मोहिमेचे उद्घाटन शालिनीताई मेघे बी. एस्सी. नर्सिंग महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. रंजना शर्मा, कॉलेज ऑफ जीएनएम नर्सिंगच्या प्राचार्य अख्तरीबानो सैय्यद शेख यांच्या हस्ते करण्यात आले. या उपक्रमात उपप्राचार्य लीना फाटिंग, सहयोगी प्राध्यापक प्रतिभा वानखडे, शबनम सय्यद, स्वीटी जवादे, सार्थक मेघे, प्रतीक्षा मुंजेवार, प्रेरणा रासेकर, सहाय्यक प्राध्यापक माधुरी खडतकर, अधिव्याख्याता कांचन गुल्हाणे, सहाय्यक प्रशासकीय अधिकारी शैला चौधरी यांच्यासह शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी झाले होते. यावेळी पर्यावरण संवर्धनाचे महत्त्व अधोरेखित करीत हरित व शाश्वत भविष्यासाठी सर्वांनी एकत्र येऊन समाजाप्रती योगदान देण्याचे आवाहन करण्यात आले.


आजचा वाढदिवस
दै. महासागर
परिवारातर्फे शुभेच्छा


किशोर दिघे


धनराज टुले


जयंत गावंडे


गजानन पारखी


भूषण वाघमारे


रजत मोटघरे


अभिजित आंडे


वैभव साटोने


प्रविण बादले


: आरएनआय रजिष्ट्रेशन क्रमांक : ६६०३२/१९९७
महासागर
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट.नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, परमार कॉम्पलेस हवालदारपुरा वर्धा - ४४२००१ येथे प्रकाशित केले आहे.
संपादक- श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, मुख्य कार्यालय मो.नं. ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३ स्थानिक संपादक नरेंद्र देशमुख मो.९०११०५८३७२ (पी.बी.आय. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.

